माहितीचा अधिकार

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे यांचे समोरील माहिती अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९(३) अन्वये दाखल झालेला द्वितीय अपील अर्ज**

द्वितीय अपिल क्र.रामाआ /३५५७/२०२५/पुणे

राज्य माहिती आयोग, खंडपीठ पुणे,
नवीन प्रशासकीय इमारत,
विधानभवनासमोर, पुणे - १

| अपिलार्थी | उत्तरवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी तथा | प्रथम अपिलीय अधिकारी तथा |
| अक्षय सुनील जगताप | उप अभियंता<br>बांधकाम विकास विभाग, झोन क्र.४<br>पुणे महानगरपालिका | कार्यकारी अभियंता<br>बांधकाम विकास विभाग, झोन क्र.४<br>पुणे महानगरपालिका |

**(सुनावणी दिनांक- ०२.०७.२०२६)**

अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयुक्त, खंडपीठ पुणे यांचे कडे दि.२५.०८.२०२५ रोजी माहितीचा अधिकार अधिनियम-२००५ चे कलम १९(३) अन्वये द्वितीय अपील दाखल केलेले आहे. द्वितीय अपील दाखल करताना प्रयोजनामध्ये मागीतलेल्या माहितीचा बेकायदेशीर नकार व प्रथम अपिल आदेशाची अंमलबजावणी न केल्याबाबत, असे नमूद केलेले आहे. सदर व्दितीय अपीलाची सुनावणी घेणेत येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटिसद्वारे कळविण्यात आले. सदर सुनावणीची वादसूची आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात आलेली आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करून देणेत आलेली आहे. आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी, तसेच विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी हजर आहेत.

प्रस्तुत प्रकरणात अपीलार्थी यांनी माहिती अर्जानूसार खालील प्रमाणे माहिती मागीतलेली आहे.

| माहिती अर्ज दिनांक | माहितीचा तपशील |
|---|---|
| ०९.०५.२०२५ | List of reserved plots in Mundhwa as per the latest Development Plan (DP), including: Survey Number/Plot Number, Type of reservation (e.g., school, garden, road, etc.), Plot area and ownership details<br>२ Physical status of each reserved plot: whether developed, vacant, encroached, or illegally constructed. ३. Status of implementation of reservations: actions taken for acquisition, development, or protection of reserved plots. ४ Information on any de-reservation proposals in Mundhwa under Section ३७ of the MRTP Act, १९६६ ५. Copy of the Development Plan (DP) Map for Mundhwa, highlighting reserved plots. ६. Names and contact details of officials responsible for implementation and monitoring of DP in Mundhwa. |

आज रोजी सुनावणी दरम्यान अपिलार्थी यांनी असे कथन केले की, " माहिती मिळाली नाही."

त्यावर जन माहिती अधिकारी यांनी कथन केले की, “ अपिलार्थी यांनी विस्तृत स्वरुपाची माहिती मागीतली आहे. ”

उपलब्ध अभिलेखांच्या पाहणीतून, जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.०६.२०२५ च्या पत्राने उत्तर दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०७.२०२५ रोजी पारित केलेल्या आदेशामध्ये क्र. १ व ६ ची उपलब्ध असलेली माहिती द्यावी उर्वरित माहिती खात्याकडे उपलब्ध नाही या खात्याच्या म्हणण्याशी सहमत आहे असा आदेश दिल्याचे दिसून येते. प्रथम अपिल आदेशानुसार जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिल्याचे दिसून येत नाही.

प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थी यांनी मागणी केलेली माहिती मोघम व विस्तृत स्वरुपाची आहे अपिलार्थी यांना नेमकी काय माहिती पाहिजे याचा बोध होत नाही. प्रकरणी अपिलार्थीस माहितीचे प्रदान झाले नाही.

सबब आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (८)(क)(दोन) नुसार प्रथम अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता बांधकाम विकास विभाग, झोन क्र. ४, पुणे मनपा यांना या प्रकरणी जनमाहिती अधिकारी म्हणून घोषित करण्यात येत असुन त्यांना आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने जोडपत्र "अ" मध्ये मागणी केलेली माहितीच्या अनुषंगाने सदरची माहिती ज्या संकेतस्थळावर आहे तसे अपिलार्थींना कळविण्यात यावे. तसेच मागणी केलेल्या माहितीपैकी संख्यात्मक माहिती आयोगाचे आदेश प्राप्त होताच १५ दिवसांचे आत अपिलार्थीस कलम ७(६) नुसार व्यक्तीश: विनामुल्य उपलब्ध करून द्यावी.

उपरोक्त निर्देशांसह प्रस्तुत द्वितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( मकरंद रानडे )
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ पुणे

जावक क्र.रामाआ /३५५७/२०२५/पुणे 4341/2026 दिनांक - 23/9/2026.

रामाआ-पुणे/२०२५/NSB